Estd : 1962
" A++" Accrediated by
NAAC (2021)
With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA**
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
**DLL 0231 2609091, 2609135 Website : www.unishivaji.ac.in E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in**
**Website Conduit:(1) Affiliation → Affiliation T2 Circulars (2) Affiliation → Affiliation T2 Information Lists**

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र**
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१ ०२३१ २६९१५३३ व ००९१ ०२३१ ६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१, २६०९१३५

संदर्भ क्र./संलग्नता/टी-२/शिष्यवृत्ती/ No 0 0 0 1 1 दि. 10 JAN 2022

**प्रति,**
**मा.प्राचार्य / संचालक,**
**सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था.**

**विषय-** उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या महाविद्यालय व विद्यापीठामधील सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजनेची NSP पोर्टलवरून सन २०२१-२२ साठी प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत ..

**संदर्भ -** १. संचालनालयाचे पत्र क्रं. उशिसं/सीएसएस/२०२१-२२/९७२२ दि.१७/०८/२०२१
२. संचालनालयाचे पत्र क्रं. उशिसं/२०२१-२२/केंद्र परुस्कूत शिष्यवृत्ती/११११९१ दि.१८/१०/२०२१
३. संचालनालयाचे पत्र क्रं. उशिसं/शिष्य/सीएसएस/२०२१-२२/१३५७७ दि.२२/११/२०२१
४. संचालनालयाकडील पत्र क्रं. उशिसं/शिष्य/सीएसएस/२०२१-२२/४७ दि.०३/०१/२०२२

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरून कळविण्यात येते की, केंद्रशासनाच्या एन.एस.पी पोर्टलद्वारे उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राज्यात महाविद्यालय व विद्यापीठामधील सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजनेची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. सन २०२१-२२ करीता १८ ऑगस्ट २०२१ पासून योजनेसाठी एनएसपी पोर्टलवरून शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरु झालेली असून, विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत १५ जानेवारी २०२२ अशी आहे.

शिष्यवृती योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी संचालनालयाच्या संदर्भिय पत्रान्वये वेळोवेळी सुचना देऊनही अद्यापही प्राप्त होणाऱ्या अर्जांच्या संख्येत वाढ होताना दिसून येत नाही.

सर्व संलग्नीत महाविद्यालये व विद्यापीठामधील सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजनेपासून एकाही विद्यार्थ्यास पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबत माहिती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्था व महाविद्यालयाची राहील, याबाबत सर्व संबंधितांना तात्काळ सूचना देण्यात याव्यात, हि विनंती.

कळावे,

आदेशान्वये

श्री विलास सोयम
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

**सोबत - वरीलप्रमाणे.**

D:\ssv\Circular.docx

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं/ शिष्य/ सीएसएस/२०२१-२२/47 दिनांक- ०३.०१.२०२२

इमेलद्वारा तात्काळ

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

-3 JAN 2022

**विषय : उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या महाविद्यालय व विद्यापीठामधील सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजनेची NSP पोर्टलवरुन सन २०२१-२२ साठी प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत.**

संदर्भ : १. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/ सीएसएस/२०२१-२२/९७२२, दि. १७.०८.२०२१
२. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/२०२१-२२/केंद्र पुरस्कृत शिष्यवृत्ती/ १११९१, दि. १८.१०.२०२१
३. संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं/शिष्य/सीएसएस/२०२१-२२/१३५७७ दि.२२.११.२०२१

केंद्रशासनाच्या एन.एस.पी. पोर्टलद्वारे उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राज्यात महाविद्यालय व विद्यापीठामधील सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजनेची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर शिष्यवृत्ती उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) परीक्षेतमध्ये कला, वाणिज्य, व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी देण्यात येते. **सन २०२१-२२ करीता दि. १८ ऑगस्ट, २०२१ पासून योजनेसाठी एनएसपी पोर्टलवरुन शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरु झालेली असून, विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत १५ जानेवारी २०२२ अशी आहे.**

सदर योजनेंतर्गत खालीलप्रमाणे लाभ देण्यात येतात.

| अ.क्र. | अभ्याक्रमाचा प्रकार | देय रक्कम |
|---|---|---|
| १ | पदवी | रक्कम रु. १०,०००/- |
| २ | पदव्युत्तर पदवी | रक्कम रु. २०,०००/- |
| ३ | पदवी व पदव्युत्तर एकत्रित (Integrated Course) | १.प्रथम ३ वर्षासाठी रक्कम रु.१०,०००/-<br>२. पुढील ४ थे व ५ वे वर्षासाठी रक्कम रु. २०,०००/- |
| ४ | अभियांत्रिकी अभ्यासक्रमांसाठी | १. प्रथम ३ वर्षासाठी - रक्कम रु.१०,०००/-<br>२. शेवटच्या वर्षासाठी - रक्कम रु.२०,०००/- |

शिष्यवृत्ती योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी संचालनालयाच्या संदर्भिय पत्रान्वये वेळोवेळी सूचना देऊनही अद्यापही प्राप्त होणाऱ्या अर्जांच्या संख्येत वाढ होताना दिसून येत नाही. सदर शिष्यवृत्तीसाठी महाराष्ट्र राज्याकरीता नवीन (Fresh) शिष्यवृत्तीसाठी ७४१७ संच निर्धारित केलेले असून सदरचे निर्धारित संचापेक्षाही अर्जांची संख्या कमी असल्याचे आढळून येत आहे.

POCO
SHOT ON POCO F1

(३.भा.प.)

तरी आपल्या विभागामधील शिष्यवृत्ती पात्र असलेल्या सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांची आढावा बैठक आयोजीत करुन, त्यांचे महाविद्यालयांमधील ज्या विद्यार्थ्यांचे नाव टॉप २० पर्सनटाईल यादीत आहे अशा सर्व विद्यार्थ्यांनी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज भरणेसाठी सूचना देण्यात याव्यात. सदर योजनेसाठी पात्र विद्यार्थ्यांची यादी विद्याशाखा प्रमाणे संचालनालयाच्या संकेतस्थळावर (www.dhepune.gov.in) प्रसिध्द करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्ज भरतांना यादीमध्ये नमुद केल्यानुसार तपशिल भरणे आवश्यक आहे, जेणेकरुन शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन पध्दतीने सुरळीत भरता येईल.

तसेच ज्या विद्यार्थ्यांना मागील वर्षी शिष्यवृत्ती मंजूर झालेली आहे, अशा विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीच्या नुतनीकरणाचा अर्ज भरणे आवश्यक आहे. शिष्यवृत्तीच्या नुतनीकरणासाठी अर्ज न भरल्यास संबंधित विद्यार्थ्यांना पुढील वर्षी योजनेसाठी अर्ज भरता येत नाही.

केंद्रशासन पुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठामधील सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजनेपासून एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबतची माहिती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठामधील विद्यार्थ्यांबाबत संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव यांची राहील. याबाबतच्या सूचना तात्काळ संबंधितांना देण्यात याव्यात.

३१.२२.

**( प्रतिभा श्री.दीक्षित )**
कनिष्ठ प्रशासन अधिकारी
उच्च शिक्षण सहसंचालक,
महाराष्ट्र राज्य, पुणे १

प्रत,

१. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१
२. मा. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, भोसलेनगर, भांबुर्डा, पुणे ०५
३. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालनालय, मुंबई ०१
४. मा. संचालक, आयुर्वेद व युनानी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१
५. मा. संचालक, आरोग्य संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. मा. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (कृषी/अकृषि/तंत्र/पशुविज्ञान/आरोग्य विज्ञान)

२/- सदर शिष्यवृत्तीसाठी आपल्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयांमधील विद्यार्थीही पात्र असल्याने सदरचे पत्र आपल्या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. तसेच याबाबत संबंधित महाविद्यालयांना तात्काळ सूचना देण्यात याव्यात. ही विनंती.

POCO
SHOT ON POCO F1